# प्रकरण - तीन

## संशोधन समस्येशी निगडीत साहित्याचे समालोचन

# प्रकरण - १ रे

## संशोधन समस्येशी निगडित साहित्याचे समालोचन


१.१ प्रास्ताविक

१.२ संशोधनसमस्येशी निगडित साहित्याचे समालोचन

१.२.१ संशोधनसमस्येशी निगडित ग्रंथ स्वरूपातील व लेख स्वरूपातील प्रकाशित साहित्याचे समालोचन

१.२.२ संशोधनसमस्येशी निगडित असलेल्या संशोधन साहित्याचे समालोचन

१.३ समारोप


=0=0=0=0=0=

# प्रकरण - १ रे

## संशोधन समस्येशी निगडित साहित्याचे समालोचन

### १.१ प्रास्ताविक :

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधनसमस्येशी निगडित साहित्याचे समालोचन केलेले आहे.

संशोधन क्षेत्राची स्थूलमानाने निवड केल्यानंतर त्या क्षेत्रात कशाप्रकारे अन्वेषण झालेले आहे. त्यासाठी कोणती पध्दती अवलंबिण्यात आलेली आहे ? कोणती आधार सामग्री प्रयोगार्थ घेण्यात आलेली आहे? कोण कोणते निष्कर्ष काढण्यात आलेले आहेत ? संशोधनासाठी कोणत्या तंत्राचा अवलंब केलेला आहे. इत्यादी गोष्टींचा अभ्यास करणे उपयुक्त ठरते. अशा प्रकारचा अभ्यास संशोधकास संशोधनाची दिशा दाखविण्याचे कार्य करतो.

संशोधित साहित्याच्या समालोचनाची उद्दिष्टे खालील प्रमाणे देता येतील.

- निवडलेल्या विषयासंबंधी पूर्ण झालेल्या संशोधनाची कल्पना प्राप्त करून त्याची पुनरावृत्ती टाळणे व योग्य संशोधन विषय निवडण्यास मार्गदर्शन मिळविणे.
- निवडलेल्या विषया संबंधी आवश्यक योग्य पध्दती, तंत्र यांच्या बद्दल माहिती मिळविणे.

- संशोधन विषयासंबंधी सिद्धांत व गृहितकृत्य यांच्या मांडणीबद्दल निश्चित कल्पना प्राप्त करून घेणे.

- आधारसामग्री व निष्कर्ष याविषयी तुलनात्मक माहिती मिळविणे. समर्पक सांख्यिक तंत्र व त्याचा उपयोग आणि निर्वचन करण्यासाठी मार्गदर्शन प्राप्त करणे.

- संदर्भ साहित्याचा अभ्यास करून स्वत:ची ज्ञानवता वाढविणे.[१]

१.२ संशोधनसमस्येशी निगडित साहित्याचे समालोचन :

संशोधन समस्येशी निगडित साहित्य दोन प्रकारचे आहे.

१) ग्रंथ स्वरूपात प्रकाशित झालेले व माहितीवजा अथवा सैद्धांतिक स्वरूपात प्रकाशित झालेले साहित्य.

२) संशोधन पदवीसाठी विद्यापीठाना सादर केलेले शोध प्रबंधाच्या स्वरूपातील साहित्य.

प्रस्तुत प्रकरणात प्रथम ग्रंथ व लेख स्वरूपात प्रकाशित झालेल्या साहित्याचा थोडक्यात आढावा घेतलेला आहे.

१.२.१ संशोधन समस्येशी निगडित ग्रंथ स्वरूपातील व लेख स्वरूपातील प्रकाशित साहित्याचे समालोचन :

श्री.ल.नी.छापेकर यांचे " असे होतात संस्कार "[२] हे पुस्तक मूल्यशिक्षणाच्या संदर्भात एकमहत्वपूर्ण पुस्तक आहे. मूल्यसंक्रमण जाणीवपूर्वक,

कर्तव्यदक्षतेने काम केलेल्या मुख्याध्यापकाने अनुभवांचे कथन या पुस्तकामध्ये केलेले आहे. मूल्यसंक्रमण करीत असताना अध्यापकाने विद्यार्थ्यांच्या संदर्भात सर्वांगाने विचार करून अष्टावधानी कसे रहावे. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वांच्या सामाजिक प्रतिष्ठेला यत्किंचितही धक्का न लावता त्यांच्या व्यक्तिमत्वातील त्रुटी कशा नाहीशा कराव्यात, त्यासाठी पालकांचे सहकार्य लागत असल्यास ते कसे घ्यावे, पालकांचे कांही चुकत असल्यास त्यानाही मार्गदर्शन कसे करावे याची आदर्श संहिता या अनुभव कथनाद्वारे मिळत राहते. प्रत्यक्ष कृतीतून आलेले अनुभव व या ठिकाणी नोंद झाले असल्याने मूल्यशिक्षणासाठी हे पुस्तक मुख्याध्यापक, शिक्षक, पालक व विद्यार्थी यांना उपयुक्त आहे.

प्रा.अ.स.जोशी यांच्या " भारतातील नैतिक व अध्यात्मिक शिक्षण आवश्यकता आणि दिशा "[३] पुस्तकामध्ये " लेखकाच्या हृदगाता" मध्येलेखक म्हणतो " हा ग्रंथ म्हणजे एकमेका करु सहाय्य अवघे धरु सुपंथ " या भावनेने केलेले हितगुज " आहे. एक प्रकारचे प्रकट चिंतन आहे. शिक्षणाद्वारे बालतरुणांचा सात्विक गुणोत्कर्ष व्हावा म्हणून सर्वांना एकत्रित येण्यासाठी केले विनम्र आवाहन आहे. सर्व सज्जनांच्या हृदयाला हळुवार घातलेली साद आहे. या ग्रंथामध्ये लेखकाने नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाची सांगड आधुनिक शिक्षणाशी कशी घालावी यांचा अत्यंत तर्कशुध्द व मुद्देसूद असा सर्वांगीण विचार केलेला पहावयास मिळतो. त्यामुळे अतिप्राचीन काळापासून ते अर्वाचीन काळापर्यंत नैतिक शिक्षणाचा विकास कस कसा होत गेला त्याचे अवलोकन करता येते.

प्रा.दि.ह.सहस्त्रबुध्दे यांचा " शिक्षणातून नैतिक मूल्यसंवर्धन"[४] हा ग्रंथ ही मूल्यशिक्षणाच्या संदर्भात अत्यंत उपयुक्त आहे. समाजजीवनातील

दोषांचे विश्लेषण करून नैतिक शिक्षणाद्वारे समाज दोषमुक्त कसा करता येईल या बाबतचा वेध त्यांनी या ग्रंथात घेतलेला आहे. यासाठी मूल्यशिक्षणाच्या संदर्भात शिक्षकाची भूमिका कोणती असावी. दैनिक पाठामधून मूल्यसंवर्धन कसे करता येईल. मूल्यसंक्रमणाच्या संदर्भात विविध कोणत्या पद्धती वापरता येतील, शालेय कार्यक्रम व त्याद्वारे मूल्यसंक्रमण व संवर्धन तसेच याबाबत शाळेमध्ये कोणकोणते उपक्रम योजता येतील व त्यातून कोणती मूल्ये संक्रमित करता येतील या बाबतीत विवेचन केलेले आहे. तसेच मूल्य संक्रमणाच्या मूल्यमापनाचाही विचार करून मूल्यमापन कसे करावे. याबाबत मार्गदर्शन केलेले आहे. त्यामुळे मूल्यशिक्षण प्रभावी होण्यासाठी सदरचा ग्रंथ शिक्षकांसाठी व पालकांसाठी अत्यंत महत्वपूर्ण व उपयुक्त आहे.

श्री.म.द.नाडकर्णी यांचे " शिक्षणाच्या वास्तव दिशा "[५] हे पुस्तक देखील महाविद्यालयातील मूल्यशिक्षण संदर्भात उपक्रमांचे आयोजन कसे करावे या विषयाचे अनुभव कथन केले आहेत. लेखकाने आपल्या महाविद्यालयात उपक्रमांमधून राबवलेले सातत्य आणि त्यामागील त्यांची निष्ठा निश्चितच अनुकरणशील आहे.

प्रा.रा.तु.भगत यांनी संपादित केलेले " आजच्या शिक्षणातील विचार प्रवाह "[६] हे पुस्तक देखील मान्यवरांचे मूल्यशिक्षण विषयक विचार जाणून घेण्यास उपयुक्त आहेत. "शिक्षण स्वभाव सुधारण्याचे ज्ञान " या डॉ.ग.श्री.खैर यांच्या लेखातून व्यक्तीच्या वाणीतून आणि कृतीतून सदाचार व्यक्त व्हावा आणि व्यक्ती सदाचारी बनून तिचे आणि पर्यायाने संपूर्ण समाजाचे जीवन मंगलमय व्हावे, या संदर्भातील विचार त्यांनी मांडलेले आहेत. वि.वि. चिपळूणकरांचा " शिक्षणाचे पंचप्राण "

हा लेख प्रेमाने प्रेम वाढवू या, यशानं यश मिळवू या, विश्वासानं विश्वास वाढवू या व संपर्कातून संपर्क वाढवू या, व स्वयंमूल्यमापनातून स्वयंविकासा- प्रत जाऊ या , ह्या शिक्षण पंचसूत्राची विश्लेषण करणारा आहे. "शिक्षण आणि संस्कार" हा यदुनाथ थत्ते यांचा लेख संस्काराचे स्वरूप आकलन करून घेण्यासाठी महत्वपूर्ण आहे. " नैतिक शिक्षण " हा गो.के.मानगावकर यांचा लेखही विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण होत असताना योग्य त्या अभिवृत्ती विद्यार्थ्यांमध्ये कशा जोपासाव्यात या संदर्भात मार्गदर्शन करणारा आहे. " आचार्य कुल: एक शाश्वत शैक्षणिक विचार " हा प्र.द. पुराणिक यांचा लेखही विनोबाजींच्या " आचार्य कुल " कल्पनेचे अधिक स्पष्टीकरण करणारा आहे.

डॉ.म.गो.देशपांडे यांनी " मनोरंजनातून संस्कार भाग १ ते ३.[७] ह्या पुस्तीका किशोर, कुमारावस्थेतील विद्यार्थ्यांसाठी अवांतर वाचनासाठी लिहिलेल्या आहेत. जगप्रसिध्द व्यक्तींच्या जीवनातील संस्कारांनी युक्त अशा घटनांचे वर्णन आपल्या रसाळ भाषेतून त्यांनी केलेले आहे. अवांतर वाचनासाठी ह्या पुस्तिका विद्यार्थी व अध्यापक यांच्यादृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण आहेत. तसेच मूल्यशिक्षणाच्या दृष्टिनेही त्या अत्यंत उपयुक्त आहेत.

डॉ.म.गो.देशपांडे यांनी, " मुलांचे तत्ववेत्ते भाग १ ते १४ ".[८] मधून भिष्म, श्रीकृष्ण, शंकराचार्य, सॉक्रेटिस, प्लेटो, ॲरिस्टॉटल, लाओत्से, कन्फ्युसियस, येशुख्रिस्त, जरतुष्ट, महंमद पैगंबर, गौतमबुध्द, महावीर, गुरुनानक जे कृष्णमुर्ती या धर्मसंस्थापक, तत्ववेत्ते यांच्या जीवनचरित्राची ओळख छोटया छोटया पुस्तिकेद्वारे थोडक्यात करून दिलेली आहे. किशोरा- वस्थेतील मुलासाठी छोटया गोष्टीरूप पुस्तिकेच्या स्वरूपामुळे या पुस्तिका

अत्यंत उपयुक्त आहेत. सर्वधर्मसमभाव निर्माण होण्याच्या दृष्टिने व मूल्यशिक्षणाच्या दृष्टिने या सारख्या पुस्तिका अत्यंत महत्वाच्या आहेत.

प्रा.लीला पाटील व प्रा.श्री.ह.शहाणे यांनी " प्रचलित शैक्षणिक समस्या "[9] हे शिक्षणातील विविध समस्यावर आधारित असलेले पुस्तक लिहिले आहे. या पुस्तकामध्ये माध्यमिक शिक्षणाची पुनर्रचना, परीक्षा पद्दती, शिक्षकांचे प्रशिक्षण, स्त्री-शिक्षण, विद्यार्थी व शिस्त, प्राथमिक शिक्षण, व्यावसायिक शिक्षण, भाषिक समस्या तसेच धार्मिक व नैतिक शिक्षणाबाबतच्या समस्या विषद करुन उपाय सुचविलेले आहेत. शीलसंवर्धन होण्यासाठी धार्मिक वननैतिक शिक्षणाची आवश्यकता असते. प्राचीन काळापासून स्वातंत्र्योत्तर काळात नैतिक शिक्षणाची स्थिती कथन केलेली आहे. धर्माचे, नैतिक शिक्षण का हवे व त्याची आवश्यकता का आहे याचे प्रतिपादन केलेले आहे.

साने गुरुजी यांचे " भारतीय संस्कृति "[10] हे मुलांच्यावर संस्कार करणारे अत्यंत उपयुक्त पुस्तक आहे. साने गुरुजी वर्धाच्या सत्याग्रहाश्रमात रहात होते तेव्हा त्यांच्या मनावर आचार्य विनोबाजी भावे यांच्या विचारांचा प्रभाव पडला. त्यातून सानेगुरुजीनी प्रस्तुत अमोल ग्रंथ लिहिला. भारतीय संस्कृति म्हणजे सहानुभूती, विशालता, सत्याचे प्रयोग, जे जे कांही सुंदर, शिव व सत्य दिसेल ते ते घेऊन वाढणारी ही संस्कृति आहे. भारतीय संस्कृति हृदय व बुद्दी यांची पूजा करणारी आहे. भारतीय संस्कृति सर्वधर्मांना सामावून घेणारी आहे. प्रस्तुत पुस्तकातील कर्म, ज्ञान, भक्ती, कर्मफलत्याग, अहिंसा इ. प्रकरणातून मूलांच्यावर चांगले संस्कार करता येतील हे यादृष्टीने हे पुस्तक शिक्षक व

विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून अत्यंत उपयुक्त ठरेल.

श्री.वि.रा.वेलणकर यांचे " जगांत वागावे कसे "[11] पुस्तक म्हणजे लेखक महाशय तीन महिने जपानमध्ये राहिले होते. जपानने आपली उन्नती कशी केली. तसे भारतात कसे घडेल या देशभक्तवृत्ती-तून व अवलोकनातून जगात वागावे कसे ? हे पुस्तक जन्मास आले. तेथील सभ्यता, परोपकारीपणा, खरे बोलणे, त्यांची देशभक्ती म्हणजे ज्या क्षेत्रात शरीराच्या चिंधड्या होणार तेथे जाण्यासाठी तरुणांची तुरमुंडी आणि या सर्वांवर ताण म्हणजे आपल्या हातून कीर्तिला काळीमा आणणारे कोणतेही कृत्य घडताच त्यांची आत्महत्या करण्याची तयारी, या उंची सद्गुणांचे वर्णन भारतीयांनी पोथी-पुराणात ऐकलेले, पण तेचे सद्गुण जपानी तरुणांच्या अंगी आजही तेथे जाणा-याला दिसतात. प्रस्तुत पुस्तकामध्ये लेखकाने संभावितपणा, नमस्काराचा प्रभाव, सद्भावना व्यक्ती करणे, आपली मुद्रा व कृतज्ञता, आपला पोषाख, संयमाचे सामर्थ्य कर्मयोग्यांचे सद्गुण, गृहिणीची कर्तव्ये, कर्म महिमा, विवेक महात्म्य, सुखाची गुरुकिल्ली, कामाच आपला गुरु, स्वराज्यातील आजचे कर्तव्य, वृद्धपणी कसे वागावे यासारख्या एकूण बत्तीस विषयावर आपले विचार प्रकट केले आहेत. या विषयातून विद्यार्थ्यांमध्ये मूल्यसंक्रमण होण्यास चांगली मदत होईल. हे पुस्तक पालक, शिक्षक, विद्यार्थी यांच्यादृष्टीने अत्यंत महत्वाचे आहे.

डॉ.रा.भा.देवस्थळी यांचा " विद्यार्थी मित्रांनो "[12] हा ग्रंथ त्यांनी शिक्षणशास्त्र विषयातील विविध विषयावर दिलेल्या भाषणांचे संकलन आहे. या ग्रंथातील " मूल्यांचे मानवीजीवनातील स्थान " हे भाषण मूल्य शिक्षणाची अत्यावश्यक गरज|शी लक्षात आणून देते, तसेच

मानवी जीवनातील मूल्यांचे महत्व विशद करते. मूल्यस्वरूपाची भूमिका स्पष्ट होण्याच्या दृष्टीने हे भाषण अत्यंत महत्वाचे आहे.

विविध शिक्षण आयोग आणि शिक्षण मंडळ यांनी नैतिक शिक्षण, मूल्य शिक्षणाच्या संदर्भात केलेल्या शिफारशीचा आढावा घेऊन एन.सी.ई.आर.टी. नवी दिल्ली या संस्थेने " Documents on social, Moral and spiritual values in Education (1979)[13] या पुस्तिकेमध्ये १८५४ ते १९६४ पर्यंत जे निरनिराळे दस्तऐवज झाले, शैक्षणिक समित्या शासनाने नेमल्या त्यांनी मूल्य शिक्षणाविषयी ज्या निरनिराळ्या शिफारशी केल्या त्या दिलेल्या आहेत. तसेच त्यांनी शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये कोणती मूल्ये बिंबविली पाहिजेत त्यामूल्यांची यादी या पुस्तिकेमध्ये दिलेली आहे. त्यांनी एकूण ८४ मूल्यांची यादी दिलेली आहे. मूल्यशिक्षण प्रभावी होण्यासाठी सदरची पुस्तिका अत्यंत उपयुक्त आहे.

/श्री.नी.शं.आंबेकर यांनी " शिक्षण प्रवाह "[१४] या पुस्तिकेमध्ये " मूल्यांचे शिक्षण " हे प्रकरण लिहिले आहे. ही पुस्तिका महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, "पुणे " यांनी प्रकाशित केली असून यामध्ये शिक्षणातील विविध प्रवाहाचा परिचय करून दिलेला आहे. प्राचीन गुरुकुल पध्दती, वर्धा शिक्षण परिषद, विद्यापीठ शिक्षण आयोग, मुदलीयार आयोग, श्री प्रकाश समिती, डॉ.संपूर्णानंद समिती, शिक्षण आयोग, संसदीय सभासद समिती (१९६७), सिमला येथे १९८१ मध्ये राष्ट्रीय स्तरावर झालेल्या मूल्यशिक्षण विषयक परिषद, महाराष्ट्रातील नैतिकशिक्षणविषयक प्रयोगिक प्रकल्प इत्यादी मधून मूल्यशिक्षणाबाबतचे दृष्टिकोन कोणते होते याचा आढावा घेतलेला आहे. यावरून असे सिध्द

होते की, मूल्यशिक्षणाची आवश्यकता सर्वच आयोगानी आग्रहाने मांडलेली आहे.

श्री महाराणी ताराबाई अध्यापक महाविद्यालय, कोल्हापूर या संस्थेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त संस्थेच्या प्राचार्यांनी संपादित करुन प्रकाशित केलेला " मूल्यशिक्षण " [१५] विशेषांकही मूल्यशिक्षणा संदर्भात महत्वाचा आहे. पाठ्यपुस्तकातील मूल्यांचा शोध घेवून ती विद्यार्थ्यांमध्ये कशी बिंबवावीत यासाठी इतिहास व मराठी विषयातील तयार केलेले सराव पाठ या विशेषांकामध्ये समाविष्ठ आहेत. मूल्यशिक्षणाच्या दृष्टिकोनातून पाठ नियोजन कसे करावे याचे मार्गदर्शनही या विशेषांकामध्ये पहावयास मिळते.

शिक्षण भारती " मूल्यशिक्षण " [१६] विशेषांक हे त्रैमासिक शिक्षण, प्रशिक्षण व संशोधन विभाग, अनेकांत व शोधपीठ श्री बहुबली विद्यापीठ, बाहुबली, जि.कोल्हापूर यांनी प्रकाशित केलेले आहे. या मासिकामध्ये मूल्यशिक्षणाची संकल्पना, वसतिगृहे आणि मूल्यशिक्षण, शालेय कार्यक्रम व मूल्यशिक्षण, शालेय उपक्रमातून मूल्यशिक्षण, शालेय प्रार्थना व मूल्यशिक्षण, शालेयविषयांच्या व माध्यमातून मूल्यशिक्षण, भाषा विषयाच्या अध्यापनातून मूल्यशिक्षण, गणित शास्त्र विषयाच्या अध्यापनातून मूल्य शिक्षण इत्यादी विषयावर विविध तज्ञांनी आपली मते मांडलेली आहेत. त्यामुळे शिक्षकाच्या दृष्टीने हे मासिक मार्गदर्शक म्हणून वापरण्यास हरकत नाही असे वाटते.

जीवन शिक्षण या मासिकातील " अध्ययनाची भावनात्मक व कौशल्यात्मक क्षेत्र "[१७] या प्रकरणातून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६

मधील मूल्यशिक्षणाचा दृष्टिकोन स्पष्ट केलेला आहे. हे मासिक महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांनी प्रकाशित केलेले आहे. भारतीय घटनेतील राष्ट्रीय मूल्ये लक्षात घेऊन पुढील मूल्ये विस्तारपूर्वक नमूद केली आहेत. भारतीय संस्कृतीचा सांस्कृतिक वारसा, समता, लोकशाही, धर्मनिरपेक्षता, स्त्री-पुरुष समानता, पर्यावरणाचे संरक्षण, सामाजिक भेदाभेद नाहीसे करणे, लहान कुटुंब प्रमाणक, वैज्ञानिक दृष्टिकोण इत्यादी मूल्यांची जोपासना करण्याची गरज प्रकर्षाने मांडली आहे. विश्व हेच एक कुटुंब असण्याची आंतरराष्ट्रीय सहकार्याची व शांततापूर्ण सहजीवनाची प्रेरणा तरुण पिढीला दिली जावी अशी अपेक्षा आहे. आपण सारी एकाच परमेश्वराची लेकरे आहोत. सामाजिक जीवनातील भिन्न परिस्थितीमुळे परस्पराविषयी निर्माण होणारे पूर्वग्रह नाहीसे व्हावेत अशा प्रकारचे शिक्षण राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये अनुस्यूत आहे.

श्री. डब्ल्यू. आर. निब्लेट यानी " मॉरल एज्युकेशन इन एचेंजींग सोसायटी "[१८] हे पुस्तक संपादित केलेले आहे. यापुस्तकामध्ये लंडन विद्यापीठातील भिन्न भिन्न वक्त्याने वेगवेगळ्या विषयावर केलेल्या भाषणांचा संग्रह आहे. या संग्रहामध्ये नैतिक शिक्षण का दिले पाहिजे, कशासाठी दिले पाहिजे व बदलत्या समाजानुसार नैतिक शिक्षण कसे दिले पाहिजे याचा विचार केलेला आहे. तसेच नैतिक शिक्षणाला बौध्दिकतेशी आणि व्यक्तिच्या वैयक्तिक मताशी जोड दिलेली आहे. विद्यार्थ्यांचे अध्ययन नुसते वाङ्मय व विज्ञानापुरते मर्यादीत न राहता त्याला नैतिकतेची जोड असली पाहिजे अशी काहींची मते आहेत. व्यक्तिला समाजामध्ये सहभाग घेता यावा व सामाजिक नियमांचे पालन करता यावे यासाठी नैतिक शिक्षण द्यावे. विद्यार्थ्यांची कल्पनाशक्ती धाडस, मानवता विकसित करण्यासाठी नैतिक शिक्षण दिले पाहिजे. विद्यार्थ्यांना

जबाबदारीची जाणीव करून दिली पाहिजे• तसेच निःपक्षपातीपणे निर्णय घेण्यास समर्थ बनविले पाहिजे• या संग्रहामध्ये मि•लुकेश, वेल्डर, एफल्ड इत्यादी वक्त्यांची भाषणे दिलेली आहेत•

डॉ•हरीराम जास्ता यांनी " स्पिरिच्युअल व्हॅल्यु अँड एज्युकेशन "[१९] हे पुस्तक लिहिले आहे• या पुस्तकामध्ये लेखकाने शिक्षणामध्ये मूल्यशिक्षणाची कशी गरज आहे याची सविस्तर चर्चा केलेली आहे• जीवन जगत असताना विज्ञानामध्ये होत राहणाऱ्या प्रगतीबरोबरच विद्यार्थ्यांच्या मनाला, भावनेला, आणि बुध्दिला योग्य वळण दिले पाहिजे• म्हणजेच विद्यार्थ्याला आत्मीक शिक्षण दिले पाहिजे मग त्यासाठी परमेश्वराच्या कल्पनेचा, धर्माचा आधार घेतला तरी चालेल कारण परमेश्वराच्या कल्पनेने आपल्याला समाधान मिळते• संस्कृती आणि शिक्षण या बद्दलही लेखकाने बरीच माहिती दिलेली आहे• आज समाजामध्ये चालणाऱ्या भ्रष्टाचार, हिंसा, नैराश्य, व्यसनाधिनता यावर नैतिक शिक्षण हा उपाय होऊ शकेल असे लेखकाला वाटते• विद्यार्थ्यांच्या नैतिक विकासावर शिक्षकाच्या चारित्र्याचा परिणाम होतो हे सत्य आहे• आधुनिक जग हे भौतिक व सुखाकडे अधिक लक्ष देत आहे• आणि त्यामुळे सद्गुण नाहीसे होत आहेत•असे दिसते• त्याची जागा दुर्गुण घेत आहेत• आणि म्हणून समाजाचे जीवन शांततापूर्ण व सुखी होण्यासाठी नैतिक मूल्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे• असे लेखक प्रतिपादन करतात•

फिलीप आर•मे• यानी आपल्या " मॉरल एज्युकेशन इन स्कूल"[२०] या पुस्तकामध्ये अनेक संस्थांना भेटी देऊन नैतिकतेविषयी विचार मांडलेले आहेत• या पुस्तकामध्ये नैतिक शिक्षणाची माहिती देत असता केवळ आदर्श दिलेले नाहीत• तर प्रात्यक्षिकावर आधारित कांही मार्ग सांगितले

आहेत. येथे विद्यार्थ्यांच्या मानसिकतेचा विचार केलेला आहे. लेखकाचे विचार समाज, तत्वज्ञान, धर्माशी निगडित आहेत. हे पुस्तक शिक्षकांसाठी अतिशय उपयोगी ठरते. आधुनिक युगामध्ये विद्यार्थ्यांला नैतिक शिक्षण देणे ही एक समस्या निर्माण झालेली आहे. अशा स्थितीत प्रस्तुत पुस्तक शिक्षकाला मार्गदर्शक ठरेल. शिक्षकांना या पुस्तकामध्ये ब-याच सूचना केलेल्या आहेत. एखाद्या व्यक्तीकडे नैतिकता आहे की नाही याचे अनेक निकष आहेत. पण सर्वसाधारणपणे व्यक्तीमध्ये असलेली जबाबदारीची जाणीव, बुध्दिवादी, दुस-याचे हित स्विकारणारी असेल तर ती व्यक्ती नैतिकदृष्टया परिपूर्ण आहे असे मानावे. तरी सुध्दा नैतिकतेच्या निकषावर व्यक्तिभेदाचा परिणाम होणारच तेंव्हा प्रत्येक विद्यार्थ्याने स्वतःचे निकष स्वतः तयार करावेत. यासाठी शिक्षणाने त्यांना तत्वज्ञानात्मक , सामाजिक, धार्मिक स्वरूपात ज्ञान द्यावे.

प्रो.आर.एस.पिटर्स हे " इथिक्स ॲण्ड एज्युकेशन "[२१] या पुस्तकामध्ये शिक्षणाला सामाजिक तत्वज्ञानाची व नैतिकतेची जोड कशी देता येईल याचा विचार करतात, लेखक तत्वज्ञानाच्या दृष्टिकोनातून शिक्षण, अध्यापन, प्रशिक्षण, विद्यापीठ आणि शाळा यांचा विचार केलेला आहे. तसेच शिक्षणामधील स्वातंत्र्य, समता, अधिकार, शिक्षा या संदर्भात असणा-या समस्यांचा उहापोह केलेला आहे. या पुस्तकामध्ये लेखकाने शाळेतील विविध विषयामधील सहसंबंध आणि अभ्यासक्रमाची एकात्मता यांच्यातील असणा-या समस्यांचा विचार केलेला आहे. अभ्यासक्रमामध्ये नैतिक मूल्ये आणि कलात्मक मूल्यांना किती महत्व दिले पाहिजे याचा विचार केलेला आहे.

डेहराडून येथील डी.ए.व्ही. कॉलेजमध्ये जून,१९८८ मध्ये महाविद्यालयीन व विद्यापीठीय पातळीवर मूल्य शिक्षण अध्यापन पध्दती

व तंत्र या संदर्भात घेण्यात आलेल्या कृतिसत्रामध्ये वाचले गेलेले निबंधही या दृष्टीने महत्वाचे आहेत.[२२]

1. Dr. Dewasthalee R.B.
   1. Significance of value system in Hman Life.
   2. The Contain of value Education in a Pluralistic Society.
2. Dr. Kulshrestha S.P.
   1. Values through ages.
   2. Value clarification strategies.
   3. Philosophical, Psychological and Sociological Concept of values.
3. Dr. Atrey J. P.

   Values and their Educational Significance.
4. Dr. RahinwalaD. N.

   Traditional Method of Teaching of values.
5. Dr. Ahluwalia S.P.

   Incukating values among students, Teachers, some suggestions.
6. Dr. Singh Ajit.

   Inculcating values search for strategies.

Papers presented in the All India workshop. On Method and Technology of Teaching values at college and University Level at D. A. V. (P.G.) College, Dehradun, JUNE - 1 to 28 1988.

## १·२·२ संशोधनसमस्येशी निगडित असलेल्या संशोधित साहित्याचे समालोचन :

वरील परिच्छेदातून ग्रंथ रूपाने तसेच लेख रूपाने प्रकाशित झालेल्या साहित्याचे समालोचन केले आहे· पुढील परिच्छेदातून संशोधन समस्येशी संबंधीत असलेल्या संशोधित साहित्याचे समालोचन केलेले आहे·

प्रस्तुत विषयाशी संबंधीत संशोधनात्मक साहित्याचा शोध घेण्यासाठी संशोधकाने पुढील ग्रंथाचे अवलोकन केले·

(१) दि थर्ड इंडियन इयर बुक ऑफ एज्युकेशनल रिसर्च , एन·सी·ई·आर·टी·, न्यू दिल्ली, १९६९·

(२) दि सर्व्हे ऑफ रिसर्च इन एज्युकेशन, संपादक – एम·बी·बुच, सेंटर ऑफ अॅडव्हान्स स्टडी इन एज्युकेशन, दि एम·एस· युनिव्हर्सिटी बरोडा १९८४·

(३) एज्युकेशन इनव्हेस्टीगेशन इन इंडियन युनिव्हर्सिटीज (१९३९–१९६१) एन·सी·ई·आर·टी·, न्यू दिल्ली, १९६३·

(४) एज्युकेशन इनव्हेस्टीगेशन इन युनव्हर्सिटीज इन महाराष्ट्र (१९३९–१९७०) स्टेट इन्स्टीटयूट ऑफ पुणे ३०

(५) दि सेकंड सर्व्हे ऑफ रिसर्च इन एज्युकेशन ( १९७२–१९७८) संपादक डॉ·एम·बी·बुच, सोसायटी फॉर एज्युकेशनल रिसर्च अॅण्ड डेव्हलपमेंट बरोडा १९७९

(६) एज्युकेशनल रिसर्च इन दि युनिव्हर्सिटीज ऑफ बॉम्बे, संपादिका डॉ.सौ.प्रतिभा देव, डिपार्टमेंट ऑफ एज्युकेशन, युनिव्हर्सिटी ऑफ बॉम्बे, १९८१.

(७) भाषा व साहित्य : संशोधन ( आवृत्ती १९८१ ) संपादक डॉ. वसंत स.जोशी, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे-३०

(८) एज्युकेशन रिसर्च इन युनिव्हर्सिटीज इन महाराष्ट्र प्लॅटिनम ज्युबिली इयर व्हॉल्यूम, संपादक डॉ.एन.के.पाटोळे, एस.टी.कॉलेज, मुंबई १९८३.

(९) थर्ड सर्व्हे ऑफ रिसर्च इन एज्युकेशन ( १९७८-१९८३ ) संपादक डॉ.एम.बी.बुच; नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशन रिसर्च ॲण्ड ट्रेनिंग, १९८६

(१०) ॲबस्ट्रॅक्टस् ऑफ डॉक्टरल रिसर्च, इन एज्युकेशन संपादक : डॉ.एस.बी.पांडे, डॉ.एम.बी.कुंडले नागपूर - सेक्रेटरी शिक्षण समीक्षा मंडळ १९८७

वरील ग्रंथाव्यतिरिक्त महाराष्ट्र राज्य संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्यावतीने प्रसिध्द होणारे रिसर्च बुलेटिन " या त्रै - मासिकाचे सर्व अंक त्याचप्रमाणे असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज नवी दिल्ली यांच्यावतीने प्रकाशित होणा-या " युनिव्हर्सिटी न्यूज " या साप्ताहिकातील " थिसीस ऑफ द ग्रंथ " या सदराखाली प्रसिध्द होणा-या विद्यापीठांनी स्वीकृत केलेल्या प्रबंधाची नावे चाळली.

वरील ग्रंथाचे काळजीपूर्वक अवलोकन करुन प्रस्तुत संशोधनाशी संबंधित जे संशोधन झालेले आहे त्याचा आढावा पुढील परिच्छेदातून घेतलेला आहे•

Ehsanul Haq (1973)[23] यांनी भारतीय राज्यघटनेत नोंद झालेली आधुनिक राजकीय मूल्ये आणि शाळेतील क्रमिक पुस्तकातील पाठ्यांशामधून बिंबविण्याची मूल्ये यांच्या संबंधाचा अभ्यास केलेला आहे• यासाठी त्यांनी दिल्लीतील शाळांमधील विशेषत: हिंदी, इंग्रजी, इतिहास, नागरिकशास्त्र या क्रमिक पुस्तकाच्या पाठ्यांशाचे वर्गीकरण विश्लेषण केलेले आहे• त्यांना मिळालेले निष्कर्ष पुढील प्रमाणे :-

क्रमिक पुस्तकातील मूल्यांच्या सादरीकरणामध्ये विशिष्ट असा साचा (पॅटर्न) किंवा सातत्य राखले गेलेले नाही•

मूल्यांचे स्वरुप आणि विद्यार्थ्यांची मानसिक क्षमता यांच्यामधील संबंध योग्य नाहीत•

विद्यार्थ्यांच्या वर्गामध्ये समान वयोगटाच्या व मानसिक पातळीच्या बाबतीत सारखेपणा राखला गेलेला नाही•

प्राथमिक स्तरावरील भाषेची पुस्तके काही अंशी मूल्ये संक्रमित करण्यास उपयुक्त ठरतील असे वाटते• पण ९ वी, १० वी व ११ वी ची क्रमिक पुस्तके पूर्णांशाने वाङ्मयीन दृष्टिकोनातून लिहिली गेलेली आहेत•

ज्या पुस्तकांतून राजकीय मूल्ये संक्रमित करावयाची अशी आपण अपेक्षा करतो त्या नागरिकशास्त्राच्या पुस्तकातूनही मूल्यासंदर्भात जाणीव-

पूर्वक व सातत्यपूर्ण प्रयत्न केले गेलेले नाहीत.

मानसिक क्षमतेच्या तत्वांनुसार १ ली ते ११ वी च्या निरनिराळ्या क्रमिक पुस्तकातून निरनिराळ्या राजकीय मूल्यावर अधिक भर दिला गेलेला नाही.

शिक्षणाच्या समाजशास्त्राचा क्षेत्रिय अभ्यास करीत असतांना श्री.गोरे यांनी (१९७०) जे संशोधन केले.[२४] त्याचे निष्कर्ष पुढील प्रमाणे आहेत.

राष्ट्रीय संस्कृतीची प्रतिके म्हणून आपण क्रमिक पुस्तकांकडे पाहू शकतो. इतर कोणत्याही साधनापेक्षा राष्ट्रीय उद्दिष्टे व मूल्ये रूजविण्यासाठी क्रमिकपुस्तकेही महत्वाची साधने आहेत. भारतातील सामाजिक तत्वप्रणाली मध्ये जर उदारमतवादी लोकशाही व शास्त्रीय तंत्रज्ञान ही जर मूल्यांची महत्वाची उगमस्रोते गृहित धरली तर शिक्षण पद्धतीनेही आपल्या कृतीतून आणि पद्धतीतून त्यांचा वापर केला पाहिजे. तर आपल्या कृतीमधून आणि पद्धतीतून इहवादी आणि बुद्धिनिष्ठ लोकशाही समाज अपेक्षिला असेल तर बुद्धिनिष्ठ इहवाद व समता यांना शिक्षण प्रक्रियेत योग्य स्थान मिळाले पाहिजे. त्यांना क्रमिक पुस्तकातून व अवांतर वाचनासाठी असलेल्या पुस्तकातून योग्य स्थान दिले गेले पाहिजे.

**Keasey** ने (१९७१)[२५] असा निष्कर्ष काढला की, सामाजिक कार्यामधील सहभाग हा व्यक्तीच्या नैतिक विकासाचा परिपाक आहे. जितक नैतिक विकास अधिक असेल तितक्याच अधिक प्रमाणात त्या व्यक्तीचा सामाजिक कार्यामध्ये अधिक सहभाग असेल.

प्रा•यु•एस•चौधरी, व प्रा•बी•ए•शर्मा यांनी इंदोर विद्यापीठामध्ये १९७४ मध्ये शोधप्रबंध सादर केला• त्यांनी एन•सी•ई•आर•टी•ने तयार केलेली राष्ट्रीय पातळीवरील इयत्ता १ ते ८ वी ची हिंदी विषयाची क्रमिक पुस्तके व मध्यप्रदेश क्रमिकपुस्तक मंडळाने तयार केलेली १ ते ८ वी ची हिंदी पुस्तके याचा या पुस्तकातून प्रतिबिंबित होणा-या मूल्यांच्या संदर्भात तुलनात्मक अभ्यास केलेला आहे• हे संशोधन त्यांनी एम्•एड• पदवीसाठी सादर केले•[२६] संशोधनातून त्यांना मिळालेले निष्कर्ष पुढील प्रमाणे आहेत•

एन•सी•ई•आर•टी•च्या क्रमिक पुस्तकातून " शौर्य" आणि "साहस" या मूल्यांवर अधिक भर दिलेला आहे•

मध्यप्रदेश क्रमिकपुस्तक मंडळाच्या क्रमिक पुस्तकांमध्ये "देशप्रेम" या मूल्यावर अधिक भर देण्यात आलेला आहे•

एन•सी•ई•आर•टी• व मध्यप्रदेश क्रमिक पुस्तक मंडळ यांच्या क्रमिक पुस्तकांमधून मूल्यांच्या सादरीकरणामध्ये बरेच साम्य असले तरी एन•सी•ई•आर•टी•च्या क्रमिक पुस्तकामधून त्याग, परमेश्वरावरील श्रध्दा, आज्ञाधारकपणा या मूल्यांवर कमी भर दिलेला दिसून येतो• तर मध्यप्रदेश क्रमिक मंडळ पुस्तकांमध्ये सहकार्य व compassion या मूल्यांवर कमी भर दिलेला आढळून येतो•

मध्य प्रदेशाच्या राष्ट्रीय (नॅशनलाईझड) इयत्ता १ ली ते ८ वी च्या हिंदी क्रमिक पुस्तकांचे मूल्यांच्या दृष्टिकोनातून मूल्यमापन प्रा•यु•एस•चौधरी यांनी केलेले आहे• हे संशोधन त्यांनी इंदोर

विद्यापीठामध्ये " वाचस्पती " (पी•एच•डी•) साठी १९७५ मध्ये सादर केले•[२७] सदर संशोधनातून पुढील प्रमाणे निष्कर्ष काढलेले आहेत•

" देशभक्ती " या मूल्याला क्रमिक पुस्तकामध्ये अधिक महत्व दिलेले असून " शास्त्रीय दृष्टिकोनाला " अल्पमहत्व दिलेले आहे•

"उद्यम", धैर्य आणि प्रेम या मूल्यांना इयत्ता १ ली ते ४ थी च्या क्रमिकपुस्तकातून जास्त महत्व दिलेले असून ५ वी ते ८ वी च्या क्रमिक पुस्तकातून प्रेम, धैर्य आणि समानता यांना अधिकमहत्व दिलेले आहे•

इयत्ता १ ली ते ४ थी च्या क्रमिक पुस्तकातून समानता, सत्य, ,अहिंसा, त्याग आणि स्वातंत्र्य यांना सारखे महत्व दिलेले आहे• तर ५ वी ते ८ वी च्या क्रमिक पुस्तकातून सहकार्य त्याग, निधर्मीपणा, आंतरराष्ट्रीय सामंजस्य याना सर्वसाधारण सारखे महत्व दिलेले आहे•

इयत्ता १ ली ते ५ वी च्या क्रमिक पुस्तकातून आरोग्य, शास्त्रीय दृष्टिकोन, निधर्मीपणा, न्याय, आंतरराष्ट्रीय सामंजस्य व साधीराहणी यांना अल्पमहत्व दिलेले आहे•

इयत्ता ५ वी ते ८ वी च्या क्रमिकपुस्तकातून शास्त्रीय दृष्टिकोन, न्याय, साधीराहणी, अहिंसा, कर्तव्याची जाणीव याना अल्प महत्व दिलेले आहे•

पाठ्यपुस्तकातील मूल्यांच्या सादरीकरणामध्ये विशिष्ट असा साचा किंवा सातत्य नाही•

**Yeager** (1979) यांनी आपल्या संशोधनात
च्या सिद्धांताचा उपयोग केला. यामध्ये वर्गाध्यापनाच्या पद्धती व त्याविषयीच्या आडाख्यांचा प्रामुख्याने समावेश आहे.[२८]

**Rise** (1981) यांनी विशिष्ट शैक्षणिक अभ्यासक्रमाचा नैतिक विकास साधण्याच्या दृष्टीने कसा उपयोग करता येईल या उद्देशाने संशोधन केलेले आहे.[२९]

**Garrod** ( 1982) यांनी केलेल्या संशोधनामध्ये उच्चमाध्यमिक पातळीवरील इंग्रजीचा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांमधील नैतिक विकास घडवून आणण्यास कितपत साहाय्यभूत होईल याचा उहापोह केलेला आहे.[३०]

**Harvey Patrica Lawson** ( 1983 ) ने विविध उपक्रमातील विद्यार्थ्यांचा प्रत्यक्ष सहभाग आणि त्या उपक्रमाबद्दल त्यांचे विचार यांची त्यांच्या नैतिक विकासाशी सांगड घालण्याचा प्रयत्न करून काही निष्कर्ष काढलेले आहेत.[३१]

**Bailey** ( 1985 ) यांनी प्राथमिक शिक्षकांची वर्गाध्यापनाच्या वेळेची सहनशीलता (विशेषत: गैरवर्तणूक करणाऱ्या मुलांना अध्यापन करताना) आणि अशा विद्यार्थ्यांच्या नैतिक विकासासंबंधी संबंधित शिक्षकांचे अंदाज याचा विचार केलेला आहे.[३२] या बाबत त्यांनी असा निष्कर्ष काढला की, सहनशीलतेची पातळी आणि स्वरूप हे त्या त्या वर्गातील विद्यार्थ्यांच्या नैतिक विकासाच्या पातळीवर अवलंबून असते.

प्रा.एन.एन.सावंत, श्रीरामपूर यांनी एम्.फिल पदवीसाठी

शोधप्रबंध सादर केला. त्यामध्ये त्यांनी इयत्ता १ ली ते ४ थी च्या भाषा, इतिहास, व भूगोल या पाठ्यपुस्तकात प्रतिबिंबीत झालेल्या मूल्यांचा चिकित्सक अभ्यास केला व या वयोगटाच्या विद्यार्थ्यांवर कोणती मूल्ये बिंबवावीत या संबंधी शिफारशी केलेल्या आहेत.[३३]

## प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टे :

(१) इयत्ता १ ली ते ४ थी च्या भाषा, इतिहास, भूगोल या पाठ्यपुस्तकांचा चिकित्सक अभ्यास करणे आणि या पाठ्यपुस्तकात प्रतिबिंबित झालेल्या मूल्यांचा शोध घेणे.

(२) इयत्ता १ ली ते ४ थी मधील वयोगटाच्या विद्यार्थ्यांवर कोणती मूल्यं बिंबवावीत या बाबत संबंधित वर्गांना शिकविणाऱ्या अध्यापकांच्या मतांचा शोध घेणे.

(३) इयत्ता १ ली ते ४ थी मधील वयोगटाच्या विद्यार्थ्यांवर कोणती मूल्ये बिंबवावित या संबंधी शिफारशी करणे.

## कार्यपद्धती :

प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब करून संबंधित संशोधनाची साधनसामग्री गोळा करण्यासाठी प्रश्नावली व मुलाखती या साधनांचा अवलंब केला आहे.

## प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष :

(१) प्रस्तुत पाठ्यपुस्तकात विविध पाठातील विषयात संस्काराच्या

दृष्टिने विविधता आढळते.

(२) धर्मांचा व मूल्यांचा निकटचा संबंध आढळून येतो.

(३) पाठ्यपुस्तकातील पाठ्यांश राष्ट्रीय व भावनात्मक ऐक्याला बाधक ठरणार नाही.

(४) मूल्ये परिणामकारक बिंबवण्यासाठी अभ्यासक्रमात बदल करण्याची आवश्यकता वाटते.

(५) इयत्ता १ ली ते ४ थी च्या भाषा विषयाच्या पाठ्यपुस्तका-द्वारे सत्य, समता, बंधुभाव, सहकार्य, एकता, प्रेमभाव ऐक्य आदी चिरंतन मूल्ये बिंबवण्याचा प्रयत्न झालेला आहे.

(६) इयत्ता ४ थी च्या इतिहासाच्या पाठ्यपुस्तकातून स्फूर्ती व प्रेरणा मिळतेच त्याशिवाय शिवरायांची मातृभक्ती, पितृभक्ती, राष्ट्रभक्ती, मित्रप्रेम, धर्मनिष्ठा इत्यादी मूल्ये बिंबवण्याचा प्रयत्न चांगला केलेला आहे.

(७) प्रस्तुत पाठ्यपुस्तके अहिंसावादी दृष्टिकोन निर्माण करत नाहीत व भ्रष्टाचाराचा उच्छेद करण्यासाठी झुंजण्याची प्रेरणा देत नाहीत.

(८) प्रत्यक्ष कृती किंवा वर्तन केल्याशिवाय मनावर मूल्ये बिंबवली जावू शकत नाहीत. इतिहास, भूगोल या पाठ्यपुस्तकात प्रत्यक्ष कृती करण्यास फारशी संधी उपलब्ध झालेली दिसत नाही.

(९) भाषा, इतिहास व भूगोल या पाठ्यपुस्तकात लोकशाही एक

जीवन पध्दती ही वृत्ती दृढिदगत होईल अशी संधी प्राप्त झालेली नाही.

(१०) श्रमसंस्कार रूजविण्यासाठी श्रमनिष्ठा व श्रमप्रतिष्ठा ही मूल्ये वृढिदगत होण्यासाठी काही सुधारणा होणे गरजेचे आहे.

प्रा.के.एन.सोगळे यांनी एम.फिल पदवीसाठी शोधप्रबंध सादर केला होता.(१९९०) त्यानी इयत्ता १ ली ते ४ थी च्या मराठीच्या पाठ्यपुस्तकांचा मूल्यशिक्षणाच्या संदर्भात चिकित्सक अभ्यास केलेला आहे व त्यावरून निष्कर्ष मांडलेले आहेत. प्रा.एम.बी.वेदांते यांनी एम्.फिल. पदवीसाठी १९९० मध्ये शोधप्रबंध सादर केला होता. यासाठी त्यानी इयत्ता ९ वी व १० वी च्या मराठीच्या क्रमिक पुस्तकांचा मूल्यशिक्षणाच्या दृष्टिने अभ्यास करून निष्कर्ष मांडलेले आहेत. प्रा.श्रीमती ससे यानी इयत्ता ११ वी व १२ वी ची मराठीच्या पाठ्यपुस्तकांचा मूल्य शिक्षणाच्या दृष्टीने चिकित्सक अभ्यास करून निष्कर्ष काढलेले आहेत.[१४]

उपरोक्त तीन अधिव्याख्यात्यानी शोधप्रबंधासाठी खालील प्रमाणे उद्दिष्टये मांडून निष्कर्ष काढलेले आहेत.

प्रा.के.एन.सोगळे यांनी एम.फिल् पदवीच्या संशोधनासाठी खालील प्रमाणे उद्दिष्टे मांडलेली होती.

(१) इयत्ता १ ली ते ४ थी या स्तरावरील मातृभाषा मराठीच्या पाठ्यपुस्तकांतील पाठांमधून व्यक्त होणा-या मूल्यांचा शोध घेणे.

(२) ही मूल्ये रूजविण्यासाठी संबंधित शिक्षक कोणते प्रयत्न करतात याचा अभ्यास करणे.

(३) ही मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये संक्रमित होत नसतील तर त्या मागील कारणांचा शोध घेणे.

(४) ही मूल्ये अधिक चांगल्याप्रकारे संक्रमित होण्यासाठी कोणती उपाययोजना आणि शैक्षणिक उपक्रम हाती घ्यावयास पाहिजेत या विषयी उपाययोजना सुचविणे.

प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष :

(१) मूल्य शिक्षणासाठी दृक्-श्राव्य साधनांचा उपयोग केला जावा.

(२) मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये किती प्रमाणात रूजली याबाबत परीक्षा पत्रकात श्रेणी द्यावी.

(३) चांगल्या वर्तनाबाबत विद्यार्थ्यांची प्रशंसा करावी अनिष्ट वर्तन करणा-या पाल्याबाबत त्यांच्या पालकांना भेटून मार्गदर्शन करावे.

(४) मुलांच्या शिक्षणाशी संबंधित असलेल्या सर्वच मानवी घटकामध्ये सामंजस्य आणि सहकार्य आवश्यक आहे.

वरील सर्व ग्रंथांचे व मूल्यांच्या संदर्भात झालेल्या प्रकाशित लेखांचे व संशोधित साहित्याचे समालोचन केले असता इयत्ता ५ वी ते ७ वी च्या मराठीच्या पाठयपुस्तकांतून प्रतिबिंबित झालेल्या मूल्यांचा

शोध करा घ्यावा ? त्याचे मार्ग, अडचणी कोणत्या या संदर्भात अद्यापि संशोधन झालेले आढळून येत नाही. त्यामुळे संशोधकांनी निवडलेला विषय नवीन आहे.

## ३.३ समारोप :

संशोधनाशी संबंधित संशोधित साहित्याचा आढावा घेतल्या नंतर आणखी एक गोष्ट स्पष्ट होते की, अद्यापि उच्च प्राथमिक स्तरावरील इयत्ता ५ वी ते ७ वी च्या मराठीच्या पाठ्यपुस्तकातून कोणती मूल्ये प्रतिबिंबित होतात ? ही मूल्ये संक्रमणासाठी शिक्षकांचे प्रयत्न कोणते आहेत ? मूल्यसंक्रमणातील अडथळे कोणते ? मूल्यसंक्रमणासाठी कोणकोणते उपाय योजता येतील याबाबत स्वतंत्रपणे संशोधन झालेले नाही. सबब प्रस्तुत संशोधन हे मुलगामी आणि नवीन ठरते.

संशोधन समस्येशी संबंधित प्रकाशित, अप्रकाशित, आणि संशोधित साहित्याचे समालोचन प्रस्तुत प्रकरणामध्ये केलेले आहे. पुढील प्रकरण क्रमांक ४ मध्ये उच्चप्राथमिक स्तरावरील इयत्ता ५ वी ते ७ वी च्या मराठीच्या प्रथमस्तर पाठ्यपुस्तकातील पाठांमधून प्रतिबिंबित होणा-या मूल्यांचे वर्गीकरण व विश्लेषण केलेले आहे.

=0=0=0=0=0=

संदर्भ :=


१. मुळे रा.शं.
उमाठे वि.तु. : शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे
प्र.आ.१९७७ नागपूर, महाराष्ट्र विद्यापीठ
ग्रंथ निर्मिती मंडळ पृ.७१

२. छापेकर ल.नी. : असे होतात संस्कार, नागपूर -
मंगल प्रकाशन १९८१

३. प्रा.जोशी अ.स. : भारतातील नैतिक व आध्यात्मिक शिक्षण
आवश्यकता आणि दिशा,
बुलढाणा : चैतन्य प्रकाशन, १९७३.

४. सहस्त्रबुद्धे दि.ह. : शिक्षणातून नैतिक मूल्यसंवर्धन
पुणे - साधना प्रकाशन १९८४.

५. नाडकर्णी म.द. : शिक्षणाच्या वास्तव दिशा
मुंबई-२८ : ललित नाटय प्रकाशन १९८७.

६. भगत रा.तु. : आजच्या शिक्षणातील विचारप्रवाह
कोल्हापूर : चैतन्य प्रकाशन, १९८२

७. देशपांडे म.गो. : मनोरंजनातून संस्कार भाग १ ते ३
कोल्हापूर : सन्मित्र प्रकाशन, १९८७

८. देशपांडे म.गो. : मुलांचे तत्ववेत्ते भाग १ ते १४
कोल्हापूर : सन्मित्र प्रकाशन, १९८७

९· पाटील लीला व शहाणे श्री·ह· : प्रचलित शैक्षणिक समस्या नागपूर हरिहरेश्वर मुद्रणालय, महाल १९६१

१०· साने गुरुजी : भारतीय संस्कृति
पुणे-२ : सुलभ मुद्रणालय, १९६३

११· वेलणकर वि·रा· : जगात वागावे कसे ?
पुणे ३० : पुणे विद्यार्थीगृह प्रकाशन १९८१

१२· देवस्थळी रा·भा· : विद्यार्थी मित्रांनो
कोल्हापूर : सन्मित्र प्रकाशन,१९८९

१३·Goyal B. R. : Documents on social, Moral and Spiritual values in Education.
New Delhi : N.C.E.R.T. 1979

१४· आंबेकर नि·शं· : शिक्षण प्रवाह
पुणे : महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, १९९०

१५· पाटील लीला : "मूल्यशिक्षण"
कोल्हापूर : प्राचार्य,श्री महाराणी ताराबाई अध्यापक महाविद्यालय,व सुवर्ण महोत्सवी विशेषांक - १९८४·

१६· उमाठे विद्याधर : शिक्षण भारती - मूल्यशिक्षण
बाहुबली, कोल्हापूर : शिक्षण व प्रशिक्षण व संशोधन विभाग,मूल्यशिक्षण विशेषांक-१९९२

१७. संचालक : जीवन शिक्षण
पुणे = महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे – १९९१.

18. Niblett W. R. (Editer) : Moral Education in a Changing Society.
(London) : Faber and Faber Limited. 1963.

19. Jasta Hari Ram : Spiritual values and Education.
(Delhi) : Rrabhat Prakashan, 1990.

20. May Philip R. : Moral Education in School.
(London) : Methuen Education Ltd. 1971.

21. Peters R.S. : Ethics and Education.
(Oxford) : George Allen and unwin Ltd., 1966.

22. Papers presented in the All India Workshop on Method and Technology of Teaching values at College and University level at D.A.V. (P.G.) College, Dehradun June 1 to 28, 1983.

23. Hag Ehsanul : Educational and Political Modernization : An analysis of school text books in Delhi, NIE, Journal, May 1973, 7 (5) 19.25.

24. Gore M.S. Et. al : Field studies in the socidogy of Education, New Delhi : N.C.E.R.T. 1970.

25. Keasey C.M. : Experimntally induced Change in moral opinions and reasoning. Journalof personality and social Psychology, 20, 30-38, 1973.

26. Choudhari, U.S. and Sharma S. N. : Comparative study of values Reflected in National and state level Hindi Text Books. M. Ed. Dissertation, Indore : University of Indore, 1974.

27. Choudhari U.S. : An Evaluation of Nationalized Hindi Text Books of Madhya Pradesh, Ph.D. thesis, Indore : University of Indore 1975.

28. Yeager Barbara, Devonnaa, Virginia, Poliy technic Institute and state University : Moral Development and Children's Literature, Abstract International vol. 44 1984.

29. Rise, speven, I : Harvard University 'An empirical study of an Educational Intervention curriculum and its facilitative effect upon moral development, Abstract International vol. 44, 1989.

30. Garrod, Andrew carruthers, Ed. D. Harward University : 'A Developmental apprech to the teaching of Literature, A context for moral and Ego growth in Adoleseenths Dessertation, Abstract International vol 45, 1984.

31. Harvey, Patrica Lawson Ph.D. University of Maryland : Moral Development and Residence Hall vantaliam Dissertation Abstract International, vol. 44, 1984.

32. Bailey, Deborah Ann, Ph.D. University of Missouri columbia : The Relationship between stages of Moral Judgement and Elementary class room teachers perceptions of distrurbing behaviour.'

Dessertation Abstract International vol. 46, 1986.

३३. प्रा.सावंत एम्.एन. : एम्.फिल, पदवी , मुंबई विद्यापीठ भारतीयशिक्षण प्रकरण-५, जुलै,१९८९

३४. प्रा.सांगळे के.एन्. : एम्.फिल. पदवी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर प्रकरण -१, मे,१९९०.

=0=0=0=0=0=